

# पर्यटकांना स्वसंरक्षणासाठीची कौशल्ये शिकविणारी 'डेला ॲडव्हेंचर ट्रेनिंग अकादमी'

## प्रसिद्ध डिझायनर, उद्योजक जिमी मिस्त्री यांची सेनेच्या संकल्पनेवर आधारित पंचतारांकित अकादमी D.A.T.A.









- लोणावळ्याजवळ उदेवाडी मध्ये स्थित देशातील पहिली अनोखी अकादमी
- देश प्रेमाची भावना जागविण्याबरोबरच 'लाइफ सेव्हिंग स्किल्स' शिकविली जातात.
- 'मिलिटरी टूरिझम'च्या संकल्पनेवर आधारित D.A.T.A. मध्ये अनुभवी-एक्स्पर्ट्स द्वारा प्रशिक्षण
- मुले, परिवार, कॉर्पोरेट्ससाठी वेगवेगळे प्रशिक्षण
- अतिरेकी हल्ला किंवा इतर कोणत्याही आणीबाणीच्या स्थितीत बचाव करण्याचे प्रशिक्षण उपलब्ध

आनंद अग्रवाल

आजकाल अतिरेकी हल्ला केव्हा आणि कोठे होईल हे कोणी सांगू शकत नाही. केवळ अतिरेकी हल्लाच नाही तर अनेक वेळा पूर येणे, आग लागणे अशा कोणत्याही आपत्तीचा सामना करावा लागू शकतो. अशा कोणत्याही स्थितीत न घाबरता आपल्याला स्वत:ला आणि आपल्या आजूबाजूच्या लोकांना कसे वाचविता येईल याच्या प्रशिक्षणाची गरज प्रत्येक नागरिकाला आहे. आणि याच प्रशिक्षणाच्या गरजेला लक्षात घेऊन मुंबईतील प्रसिद्ध डिझायनर, उद्योजक आणि 'डेला' ग्रुपचे संस्थापक जिमी मिस्त्री यांनी एक अनोखी प्रशिक्षण अकादमी स्थापन केली आहे.

लोणावळ्याजवळ, राजमाची किल्ला आणि शिरोटा डॅमच्या जवळ, तीन एकर परिसरात 'डेला ॲडव्हेंचर ट्रेनिंग अकादमी' किंवा D.A.T.A. ची स्थापना करून या प्रकारचे प्रशिक्षण उपलब्ध केले जात आहे. या प्रकारचे प्रशिक्षण सामान्य नागरिकांना देणारी ही देशातील पहिली आणि एकमात्र संस्था आहे. येथे प्रशिक्षण घेणाऱ्यांना 'लाइफ सेव्हिंग स्कील्स'बरोबरच पंचतारांकित लक्झरीचा अनुभवही मिळतो, जो या प्रशिक्षणाचा आनंद द्विगुणित करतो. रिसॉर्ट, व्हिला आणि ॲडव्हेन्चर पार्क या क्षेत्रात आपले पाय यशस्वीपणे रोवणाऱ्या 'डेला ग्रुप' ने D.A.T.A. स्थापन करून राष्ट्रप्रेमाच्या उत्कट भावनेचा आदर्श स्थापित केला आहे.

नुकतेच पुणे, तसेच लोणावळा येथील काही निवडक पत्रकारांचा D.A.T.A. येथे दौरा करण्यात आला. तेथे त्यांना संस्था पाहण्याची आणि येथील प्रशिक्षणाचा अनुभव घेण्याची संधी देण्यात आली.

D.A.T.A. अशा ठिकाणी स्थित आहे जी Della Resorts पासून सुमारे १४ किमी दूर आहे. आणि तो संपूर्ण कच्चा रस्ता आहे, जो डोंगरांमधून जातो. येथे आपण कार किंवा वाहनाने जाऊ शकत नाही. तर जीप किंवा मिलिटरीप्रमाणे असलेल्या ट्रकमधूनच जाता येते. त्यानंतर सुमारे १५ मिनिटांचा नावेचा प्रवास करावा लागतो. जो शिरोटा नदी किंवा शिरोटा डॅमच्या backwaters मधून आहे.

कठोर परिश्रम करून जेव्हा तुम्ही D.A.T.A. मध्ये पोहोचता तेव्हा रस्त्यावरील सर्व थकवा विसरून जाता. D.A.T.A. चे प्रशिक्षण प्रत्येकासाठी आवश्यक आहे, मग ती मुले असोत, महिला असोत, तरुण असोत किंवा ज्येष्ठ नागरिक असोत. येथे सेनेच्या निवृत्त अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सेनेच्या सदर्न कमांडचे माजी प्रमुख रिटायर्ड लेफ्टनंट जनरल रेमंड नर्होना यांच्या नेतृत्वाखाली जवानांच्या तुकड्या प्रशिक्षण देतात. प्रत्यक्ष रूपाने अतिरेक्यांचा खात्मा करणारे ब्लॅक कॅट कमांडोसुद्धा या तुकड्यांमध्ये सामील आहेत. अतिरेक्यांचा हल्ला किंवा अन्य कुठल्याही आणीबाणीच्या स्थितीत संकटाला न घाबरता त्यापासून बचाव करण्याचे प्रशिक्षण येथे दिले जाते. यामध्ये बॅलन्स सांभाळून पाईपवरून चालणे, भिंतीचा अडथळा दूर करणे, क्रॉलिंग करताना पुढे सरकणे, दोरीच्या मदतीने वर चढणे, दोरीच्या मदतीने तयार पूल पार करणे, आगीत चालणे यासह १९ प्रकारचे अडथळे पार करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. त्याव्यतिरिक्त अतिरेक्यांकडून अचानक फायरिंग केले जाण्याच्या स्थितीत स्वत:ला वाचविण्याचे प्रशिक्षणही दिले जाते.

या सर्व प्रशिक्षणासाठी एक ते दोन दिवसांच्या कालावधीत विविध कार्यक्रम येथे केले जातात. त्यामध्ये अतिरेकी हल्ल्यापासून वाचण्याचे प्रशिक्षण, आणीबाणीची स्थिती उत्पन्न झाल्यास स्वत:चा आणि दुसऱ्यांचा बचाव करणे आणि प्रतिकूल परिस्थितीत जंगलात आपले रक्षण कसे करावे? या दृष्टीने लोकांना तयार करण्याचा कार्यक्रम यामध्ये सामील आहे. यासाठी रात्रीच्या वेळेस जंगलातून जाण्याचा अनुभवही पर्यटकांना दिला जातो. प्रत्येक व्यक्तीत एक देशभक्त सैनिक लपलेला असतो. ही भावना जागृत करण्यासाठी येथे येणाऱ्या सर्व लोकांना आर्मीचा ड्रेस दिला जातो. त्यामुळे जवानांच्या आयुष्यातील समस्यांचा अनुभव मिळतो.



DATA चे संस्थापक जिमी मिस्त्री

यावेळी आयोजित पत्रकार परिषदेला Della Group चे संस्थापक, तसेच चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर श्री. जिमी मिस्त्री यांनी संबोधित केले. त्यांनी Della Group च्या स्थापनेपासून D.A.T.A. च्या निर्मितीपर्यंत आपले अनुभव पत्रकारांसमोर कथन केले. त्यांनी सांगितले की, २६/११/२००८ मध्ये मुंबई हल्ल्यानंतर त्यांचे मन रागाने भरून गेले. त्यांना वाटले की देश आणि नागरिकांना अशा वेळी कशाप्रकारे वाचविता येऊ शकेल? त्यावर विचार होणे आवश्यक आहे. तेव्हाच त्यांच्या मनात D.A.T.A. च्या कल्पनेने जन्म घेतला. त्यानंतर त्यांनी लोणावळ्यामध्ये त्यांच्या Della Resorts आणि Della Adventure Park पासून काही अंतरावरच जागा निवडून काम सुरू केले. संकल्पना सुचल्यानंतर final product तयार होण्यासाठी तीन वर्षे लागली. पण जे final product तयार झाले आहे, त्याची त्यांनी स्वत: सुद्धा कल्पना केली नव्हती की, इतके ते सुंदर असू शकते.

श्री. जिमी मिस्त्री यांनी D.A.T.A. विषयी पुढे सांगितले की, D.A.T.A. मुळे 'मिलिटरी टूरिझम'च्या नवीन संकल्पनेची सुरुवात आम्ही केली आहे. या संकल्पनेतून तीन मुख्य फायदे असे असतील, ज्यामध्ये १) नागरिकांमध्ये देशभक्तीच्या भावनेची ज्योत जागृत करणे. २) स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे. तसेच ३) मिलिटरीच्या दिग्गज ज्येष्ठांना यात समाविष्ट करून लोकांशी त्यांच्या अनुभवांचा परिचय घडवून आणणे आणि त्यांच्या कला-कौशल्याचा योग्य उपयोग करणे.

त्यांनी पुढे सांगितले की, D.A.T.A. मध्ये मुले, परिवार, तसेच कॉर्पोरेट्स यांच्यासाठी विशेष प्रशिक्षण प्रोग्रॅम तयार केले आहेत. त्यामुळे त्यांना आवश्यकतेनुसार प्रशिक्षण दिले जाऊ शकेल. त्याव्यतिरिक्त मुलींसाठी स्वसंरक्षणाचा एक प्रशिक्षण कार्यक्रम वेगळा बनविला आहे. ज्यामध्ये त्यांना संकटाच्या वेळी आपले स्वसंरक्षण कसे करावे याचे प्रशिक्षण दिले जाते.

श्री. जिमी मिस्त्री यांनी असेही सांगितले की, D.A.T.A. मध्ये दिले जाणारे प्रशिक्षण शारीरिक पेक्षा मानसिक प्रशिक्षण आहे. ते तुम्हाला आपल्या स्वत:च्या ताकदीची जाणीव करून देते. आणि तुम्हाला आपल्या limitations सुद्धा समजून येतात. येथील प्रशिक्षण आणीबाणीच्या प्रसंगांबरोबरच आपल्या रोजच्या जीवनातही उपयोगी सिद्ध होते. कारण ते तुम्हाला सावध राहणे किंवा जागरूक राहणे याबरोबरच कठीण परिस्थितीत हिंमत न हरणे हे शिकविते.

श्री. जिमी मिस्त्री यांनी शेवटी सांगितले की, D.A.T.A. ला सुरू होऊन सुमारे एक वर्ष झाले आहे आणि या दरम्यान १०० पेक्षा अधिक प्रतिष्ठित कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांनी येथे प्रशिक्षण घेतले आहे. त्यांनी येथील सुविधा, कुशल आणि प्रशिक्षित कर्मचारी, मिलिटरी स्टाफ यांची भरपूर प्रशंसा केली. आणि त्यानंतर त्या कंपन्यांचे कर्मचारी आपल्या परिवाराबरोबर येथे पुन्हा दुसऱ्यांदा येत आहेत. हा आपल्यामध्ये एक सर्वात वेगळा अनुभव आहे. जो प्रत्येकाने घेतला पाहिजे. तीच आमच्यासाठी देशभक्तीची खरी ओळख असेल.

जिमी मिस्त्री यांची ही कल्पना आता हळूहळू लोकप्रिय होत आहे. डेला रिसॉर्टमध्ये येणारे अधिकांश पर्यटक D.A.T.A. मध्येही येतात. D.A.T.A. च्या प्रशिक्षण कार्यक्रमात लहान मुले, परिवार आणि वेगवेगळ्या कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी वेगवेगळे अभ्यासक्रम तयार केले गेले आहेत. युद्धभूमीमध्ये लढाईसाठी बनणाऱ्या योजनेबरोबरच, कॉर्पोरेट जगताच्या आव्हानांना पाहून, कॉर्पोरेट जगताला D.A.T.A. च्या प्रशिक्षणाचे विशेष आकर्षण आहे. गूगलसारख्या अधिकांश मोठ्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांचे नुकतेच प्रशिक्षण झाले आहे. निसर्गाच्या जवळ आराम करत सेनेच्या जवानांच्या जीवनाचा अनुभव घेण्याची संधी प्रत्येकाने घेतली पाहिजे.

या अकादमीचा अनेक प्रसिद्ध लोकांनी दौरा करून त्याची खूपच प्रशंसा केली आहे. यामध्ये प्रमुख रूपाने सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर, माधुरी दीक्षित, आदित्य ठाकरे, विश्वास नांगरे-पाटील यांची नावे समाविष्ट आहेत.

**अधिक माहितीसाठी : अमितेश बॅनर्जी**
(हेड, बिझनेस डेव्हलपमेंट आणि प्रमुख कॉर्पोरेट कम्युनिकेशन विभाग)
मोबा. +९१८२९११३७४१० किंवा वेबसाइट www.delladata.com वर संपर्क साधता येऊ शकेल.





